**नियमित फौजदारी खटला क्र. २११/२०२३**

**विठ्ठल वि बाबुराव व इतर**

**निशाणी क्र. २०**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक २ ची साक्ष**

मी याद्वारे शपथेवर कथन करते की,

माझे नाव – सारिका विठ्ठल जाधव,

माझे वय – ४० वर्षे, व्यवसाय –शेती

राहणार – रा. शेरेशिंदेवाडी, ता. फलटण, जि.सातारा

**साक्षीदाराचा सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.डी.कदम यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

आरोपी क्र.१ माझा दिर आहे, आरोपी क्र.४ ही माझी जाऊ आहे व आरोपी क्र.२ हा माझा पुतण्या आहे. माझी नाईकबोमवाडी येथे गट क्र. १३३ मध्ये शेतजमीन आहे. सदर शेतजमीनीमध्ये आमची विहीर पाईपलाईन व मोटार आहे. आम्ही सदर जमीनीमध्ये भाजीपाला, मका, गहू, ऊस अशी पिके घेतो. आम्ही सदर जमीन विहीरीच्या पाण्याने भिजवतो. आम्ही विहीरीला सिमेंटचे खांब उभे करुन तारेचे कम्पाऊंड केले आहे. दि.२४.१०.२०२२ रोजी संध्याकाळी त्यावेळी आमच्या विहीरीचे सिमेंटचे खांब, कम्पाऊंड, मोटारचे खोके, पाण्याची पाईप मोडली होती. मोटार विहीरीत पाईपसमवेत बुडवून टाकली होती. मी व माझे पती दुस–या दिवशी सकाळी ७.०० वाजता आमच्या गट क्र. १३३ मध्ये गेलो असता आम्हाला सदरची घटना दिसली. त्यावेळी निवृत्ती निकम आमच्या घरी आले होते. आम्हाला वाटले होते ते आमच्या दिराने केले असेल, त्यामुळे आम्ही आरोपींना विचारायला दि.२५.१०.२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता गेलो होतो. त्यावेळी आरोपींनी घरातुन बाहेर येवून आम्हाला शिवीगाळ केली, दमदाटी केली. त्यावेळी आरोपी आम्हाला म्हटले की, आम्हीच फोडले व आम्हीच टाकले. आम्ही पुन्हा तसेच करणार, आम्ही कोणाला भित नाही. तसेच, रात्री पाणी दयायला गेले तर तुम्हाला मारुन टाकू, तुम्ही कसे भिजवताय ते पाहतो. त्यावेळी निवृत्ती निकम याने भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला. परंतु, आरोपींनी ऐकले नाही. त्यानंतर आम्ही तक्रार देण्यासाठी फलटण ग्रामीण पो.स्टेशनला गेलो होतो. त्यांनी दिवाळीचा सण असल्याने दोन दिवसांनी यायला सांगितले. त्यानंतर आम्ही दि.२८.१०.२०२२ रोजी तक्रार दिली. पोलिसांनी एन.सी. नोंदवून घेतली. परंतु, कारवाई केली नाही. त्यामुळे आम्ही सदरची फिर्याद दाखल केली आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर.व्ही.बोराटे यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.४ ही माझी जाऊ व सख्खी बहिण आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पतीच्या सांगण्यावरुन साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या विहीरीचे कम्पाऊंड तोडताना, खांब तोडताना व मोटार विहीरीत सोडताना मी आरोपींना प्रत्यक्ष पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, निवृत्ती निकम हे आमचे जवळचे नातेवाईक असून त्यांच्या घरी आमचे जाणे येणे असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर कथित घटनेपूर्वी आरोपींचे व आमचे एकमेकांवर खटले दाखल होते. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनेपूर्वी आरोपींचे व आमचे एकमेकांकडे जाणे येणे नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ व ३ हे शिक्षण घेत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचे कुटूंब व आरोपींचे कुटूंब यांचे घटनेपूर्वी वाद असल्यामुळे ते एकमेकांवर चिडून आहेत. मी माझ्या पतीबरोबर घटनेनंतर तक्रार दयायला गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने दि.२८.१०.२०२२ रोजी आरोपींविरुद्ध खोटी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनेच्या दिवशी आम्ही फिर्याद दिली नव्हती.

३. नाईकबोमवाडी ते फलटण ग्रामीण पोलिस स्टेशन यातील अंतर १५ किमी आहे. आमचे नाईकबोमवाडी हे बरड पोलिस दुरक्षेत्रामध्ये येते. आम्ही घटनेनंतर प्रथम बरड पोलिस दुरक्षेत्र येथे गेलो होतो. आम्ही बरड दुरक्षेत्र पोलिस चौकी येथे गेल्यानंतर त्यांनी दिवाळीचा सण आहे, दोन दिवसांनी या असे सांगितले. आम्ही त्यानंतर आमच्या घरी परत गेलो होतो. बरड दुरक्षेत्र पोलिस चौकी यांनी आमची तक्रार लिहून घेण्याचे टाळले म्हणून आम्ही त्यांच्या वरिष्ठांकडे गेलेलो नाही. आम्ही दि.२५.१०.२०२२ रोजी पहिल्यांदा पोलिस स्टेशनला तक्रार दयायला गेलो होतो. आम्ही त्यानंतर दि.२७.१०.२०२२ रोजी तक्रार दयायला गेलो होतो, परंतु पोलिसांनी तक्रार घेतली नाही. पोलिसांनी आमची तक्रार घेतली नाही म्हणून आम्ही त्यांच्या वरिष्ठ पोलिस अधिका–यांकडे तक्रार केलेली नाही. पोलिसांनी एन.सी. नोंदवली होती.

**आरोपींच्या विधीज्ञांनी पुढील उलटतपास दोषारोप निश्चितीपर्यंत राखून ठेवण्याची विनंती केली त्यामुळे उलटतपास तहकूब करण्यात येतो.**

फलटण. (ए. एस. साटोटे)
दिनांक – १९.०१.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण
न्यायालय क्र.३